MHKO070013922016

**रे.क.नं.२५०/२०१६**

**रमेश नामदेव कांबळे आणि इतर**

**विरुध्द**

**अमोल यशवंत कांबळे आणि इतर**

## नि.क्र.४६ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने सी.पी.सी.चे ऑर्डर ६ रूल १७ प्रमाणे दावा दुरूस्ती कामी दाखल केला आहे.

२. वादीने प्रस्तुत अर्जात कथन केले आहे की, प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र.२.१ फुलाबाई बापू कांबळे या मयत झालेल्या आहेत. त्यांना सदर कामातील प्रतिवादी क्र.२.२ ते २.४ आणि ३ व ४ असे वारस आहेत. तरी प्रतिवादी क्र.२.१ चे नावासमोर मयत असा शेरा मारुन तशी दावेच्या सरनामेत दुरुस्ती करण्यास परवानगी मागीतली आहे. विरुध्द बाजुने त्यांचे म्हणणे सदर अर्जाच्या पाठीमागे नोंदवुन असे कथन केले आहे की, प्रस्तुत अर्जास कोणत्याही प्रकारे ॲफीडेव्हीट दिले नसलेने प्रस्तुतचा अर्ज चालणेस पात्र नाही. मात्र सदरचा अर्ज मंजुर करणेचा निर्णयापर्यंत मे. कोर्ट आलेस वादींना कॉस्ट करण्याची मागणी केली आहे.

३. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे त्यांच्या वकीलांनी युक्तीवाद केला. युक्तिवादानंतर माझे विचाराधीन आलेले मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष विवेचनासह खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी हे मागितलेली सुचित दुरुस्ती मिळण्यास पात्र आहेत काय ? | ...होय |
| २. | काय आदेश? | ...अंतिम आदेशान्वये |

## का र ण मि मां सा

**मुद्या क्र. १ करिता**

**४.** वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादीविरुध्द हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. ***स्टेट ऑफ आंध्रप्रदेश आणि इतर वि. मे. पायोनियर बिल्डर्स आंध्रप्रदेश, ए.आय.आर.२००७–एस.सी.११३*** या न्यायनिर्णयात मा. सर्वोच्च न्यायालय यांनी वाद कथनामध्ये उदारपणे दुरुस्ती करण्याचा मुख्य उद्देश हा निरनिराळे दावे टाळणे असल्याचे मत नोंदवलेले आहे.

**५.** अर्ज पाहता त्यामध्ये सुचित दुरुस्ती ही केवळ तांत्रीक स्वरुपाची असल्याचे दिसुन येते. त्यामुळे अर्जात नमुद प्रमाणे दुरुस्ती केल्यास दोन्ही पक्षकारांचे नुकसान होणार नाही. तसेच प्रतिवादींना कुठल्याही आश्चर्यकारक वस्तुस्थितीचा सामना करावा लागणार नाही. विरुध्द बाजुने सदर फुलाबाई मयत नसल्याबाबत कथन केलेले नाही. प्रस्तावित दुरुस्ती अर्जान्वये वादी हे कुठल्याही प्रकारे नविन केस मांडत नाही. दाव्यातील पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील ख–या वादाच्या मुद्दयावर निर्णय घेण्यासाठी प्रस्तावित दुरुस्ती अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे या निष्कर्षापर्यंत मी येत आहे. त्यामुळे वरील सर्व कारणांचा सारासार विचार करता प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

## आदेश

१. वादीचा अर्ज (नि.क्र.४६) हा मंजुर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तावित दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करावी.

३. वादी व प्रतिवादींनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2025.11.19 17:07:30 +0530

**(अ. त्रिं. मनगिरे)**

दिनांक १९/११/२०२५

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale. |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 19/11/2025. |
| Judgment/order signed by the PO on | 19/11/2025. |
| Judgment/order uploaded on | 19/11/2025. |